महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २२८ वा | दिनांक : ०५/०७/२०२५ | वार : शनिवार

# ठाकरे कुटुंबाचे महाराष्ट्रातील योगदान मोठे - सुप्रिया सुळे



**पुणे :** ठाकरे कुटुंबाने महाराष्ट्रात मोठे योगदान दिले आहे. ठाकरे हे फक्त एक नाव नाही, तर एक ब्रँड आहे. त्यांच्या कुटुंबातील दोन सदस्य एकत्र आले, तर त्यांचे मनापासून स्वागत करू. कोणतीही गोष्ट मनापासून केली पाहिजे, अशा शब्दांत राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांनी ठाकरे बंधूंच्या मनोमीलनावर शुक्रवारी भाष्य केले.

खासदार सुप्रिया सुळे शुक्रवार सकाळपासून हिंजवडी आयटी पार्कसह माण मारुंजी परिसरातील रस्त्यांची दयनीय अवस्था, वाहतूक कोंडी आणि वाहतुकीच्या समस्येची पाहणी केली. त्यानंतर त्या बोलत होत्या. सुळे यांनी 26 जुलैपर्यंत हिंजवडीतील रस्ते दुरुस्त करण्यासाठी प्रशासनाला अल्टीमेटमदेखील दिला आहे. सुळे म्हणाल्या, की 26 जुलैपर्यंत परिस्थिती सुधारली पाहिजे. अन्यथा, आमचा नाईलाज होईल. हिंजवडीचा विकास झाला पाहिजे. हिंजवडी ग्रामपंचायत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत विलीन करण्याबाबत नागरिकांचे मत महत्त्वाचे आहे. वेळेत परिस्थिती सुधारली, तर हिंजवडीला येऊन संबंधित सरकारी अधिकाऱ्यांचे अभिनंदन करू, असेही त्यांनी सांगितले.

ठाकरे कुटुंबाने महाराष्ट्रात मोठे योगदान दिले आहे. ठाकरे हे फक्त एक नाव नाही, तर एक महत्त्वाचा ब्रँड आहे. शिवसेनेचा प्रत्येक कार्यकर्ता ठाकरे आहे. त्यांनी मोठ्या श्रद्धेने शिवसेना बांधली आहे. त्यांच्या कुटुंबातील दोन सदस्य एकत्र आले तर त्यांचे मनापासून स्वागत केले जाते. कोणतीही गोष्ट मनापासून केली पाहिजे. यश आणि अपयश प्रत्येकाच्या आयुष्यात येतात. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी देश आणि राज्यासाठी योगदान दिले आहे. जेव्हा इतिहास लिहिला जाईल, तेव्हा त्याचा उल्लेख केला जाईल. त्यांचे योगदान कोणीही संपवू शकत नाही, असे मतही सुळे यांनी नोंदवले. राज्यातील गुन्हेगारीला राज्य सरकार जबाबदार आहे. राज्य सरकारमुळे राज्यातील गुन्हेगारी वाढली आहे, असा आरोपही त्यांनी केला.

# एकनाथ शिंदेंनी दिला 'जय गुजरात'चा नारा



**पुणे :** राज्यात मराठी भाषेच्या मुद्द्यावरून चांगलेच वातावरण तापलेले आहे. मराठी भाषेच्या मुद्द्यावरून राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे उद्या विजयी मेळावा साजरा करत आहेत. मात्र या मेळाव्याच्या आदल्याच दिवशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांच्या हातात आयते कोलीत दिले आहे. अमित शहा यांच्या उपस्थितीत पुण्यातील एका कार्यक्रमात एकनाथ शिंदे यांनी थेट गुजरातची घोषणा दिली. त्यामुळे आता मोठे राजकीय वादंग निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे सध्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. त्यांच्या उपस्थितीत पुण्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अशाच एका कार्यक्रमात एकनाथ शिंदे यांनी देखील सहभाग घेतला. या दरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'जय गुजरात' अशी घोषणा करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. भाषणादरम्यान एकनाथ शिंदे यांनी जय हिंद, जय महाराष्ट्र आणि जय गुजरात असा नारा दिला. त्यामुळे आता अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या कार्यक्रमाला स्थानिक मंत्री, लोकप्रतिनिधी आणि भारतीय जनता पक्ष तसेच महायुतीतील प्रमुख नेते आणि पदाधिकारी उपस्थित होते. याच कार्यक्रमात एकनाथ शिंदे यांनी जय गुजरात अशी घोषणा दिली. त्यामुळे आता त्यांच्यावर राजकीय आरोप होतील, यात वाद नाही. या घोषणेमुळे त्यांचे कोणते राजकीय संकेत आहेत का? हे देखील अद्याप समोर आलेले नाही. मात्र या घोषणेमुळे आता महाराष्ट्राच्या राजकारणात चर्चेसाठी नवीन विषय मिळाला आहे.

सत्ताधारी महायुती सरकारवर गुजरात धार्जिणे असल्याचा आरोप विरोधकांच्या वतीने वारंवार केला जातो. यातच मुंबईतील अनेक महत्त्वाचे उद्योग हे गुजरातला पळवले जात असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गट करत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांनी जय गुजरात अशी दिलेली घोषणा आता वादग्रस्त ठरणार आहे. आपल्या भाषणाचा शेवट करताना एकनाथ शिंदे यांनी जय गुजरात असा उल्लेख केला. नेमके आजच एकनाथ शिंदे यांनी जय गुजरात का म्हणाले असेल? या विषयी आता तर तर्क-वितर्क लावले जात आहेत.

या सरकारचा वास्तविक-पणा, महाराष्ट्राच्या मातृभूमीबद्दल आणि मातृ भाषेबद्दल या सरकारचे मत काय? हे आता स्पष्ट झाले आहे. हे सर्वजण गुजरातच्या वॉशिंग मशीन मध्ये धुतले गेलेले आहेत. गुजरातच्या वॉशिंग मशीनचा यांच्यावर झालेला परिणाम अद्यापही उतरलेला नसल्याचे कॉंग्रेसचे नेते नाना पटोले यांनी उपस्थित केला आहे.

जय हिंद हे आपल्या देशावरचे प्रेम आहे. जय महाराष्ट्र हे महाराष्ट्र राज्यावरचे प्रेम आहे. मात्र जय गुजरात म्हणजे हिंदी बरोबर आता गुजराती शिकणे देखील बंधनकारक होईल याची सुरुवात एकनाथ शिंदे करून देत आहेत का? असा प्रश्न ठाकरे गटाच्या नेत्या किशोरी पेडणेकर यांनी उपस्थित केला. तुम्ही बाळासाहेबांचे विचार घेऊन चाललो असे लोकांना भासवत आहात. मात्र, त्यामध्ये जय गुजरात असा नारा कधीच बाळासाहेबांचा नव्हता, असे देखील किशोरी पेडणेकर यांनी म्हटले आहे. एकनाथ शिंदे यांनी गुजराती नेत्यांसमोर लोटांगण घातले असल्याचा आरोप देखील पेडणेकर यांनी केला आहे.

# ठाकरे बंधूंचे मनोमिलन हा फडणवीसांचा प्लॅन - इम्तियाज जलील यांचा दावा

**छत्रपती संभाजीनगर :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मनोमिलनामागे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हात असल्याचा दावा एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी केला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपल्याशी दगाफटका करू शकतात अशी भीती देवेंद्र फडणवीस यांना वाटत आहे. त्यामुळे त्यांनी राज व उद्धव यांना एकत्र आणण्याचा प्लॅन आखला आहे, असे ते म्हणालेत.

इम्तियाज जलील आज एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले की, राज ठाकरे व उद्धव ठाकरे हे दोन भाऊ एकत्र येत आहेत. त्यांच्या एकत्र येण्यामागे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हात आहे. फडणवीस यांना माहिती आहे की, एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होण्यासाठी केव्हाही त्यांची साथ सोडू शकतात. जे उद्धव ठाकरे यांना सोडून जाऊ शकतात, ते उद्या इतर कुणी ऑफर दिली तर त्यांच्यासोबतही जाऊ शकतात. त्यामुळे त्यांना चेकमेट करण्यासाठी फडणवीसांनी ठाकरे बंधूंना एकत्र आणण्याची चाल खेळली आहे.

इम्तियाज जलील यांनी यावेळी मुंबईत ठाकरे बंधू एकत्र आले तर त्याचा सर्वात मोठा फटका एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला बसणार असल्याचाही दावा केला. राज व उद्धव ठाकरे एकत्र आले तर मुंबई महापालिका निवडणुकीत एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेला मोठा फटका बसेल. सध्या मराठी माणसांना जे हवे आहे, तेच होत आहे. आम्ही विरोधात असूनही शिवसेना ही मराठी माणसाची ताकद आहे हे मान्य करतो, असे ते म्हणाले. त्यांच्या या विधानाद्वारे एमआयएम भविष्यात महाविकास आघाडीशी आघाडी करण्याचे संकेत मिळत आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०५ जुलै २०२५


## प्राचार्य केशव भांगे यांचा भव्य नागरी सत्कार



**शिरूर (का.) :** कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात बदली होऊन आलेले सन्माननीय मुख्याध्यापक तथा प्राचार्य मा. केशव भांगे साहेब यांचे शिरूर कासार व पंचक्रोशीतील विविध मान्यवर, प्रतिष्ठित नागरिक, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, नगरसेवक, जेष्ठ कार्यकर्ते यांच्या वतीने भव्य नागरी सत्कार करण्यात आला आहे. आदर्श शिक्षण संस्था बीड' चे सचिव तथा माजी कॅबीनेट मंत्री मा.जयदत्त (अण्णा) क्षीरसागर साहेब यांनी स्वत: शिरूर (का.) कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय हे संस्थेतील सर्वात मोठे युनीट असल्या कारणाने प्राचार्य केशव भांगे साहेब हे सक्षम,धराडीचे व तरूणतडफदार व्यक्तीमत्त्व अशी ओळख असल्यामुळे प्राचार्य केशव भांगे साहेबांवर शिरूर (का.) येथील कालिकादेवी विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयाची जबाबदारी टाकली आहे. यामुळे मा. अण्णासाहेबांच्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत असून नव्याने रूजु झालेले. प्राचार्य केशव भांगे साहेब यांचा अनेकविध मान्यवरांच्या वतीने स्वागत व सत्कार होत आहेत. यामध्ये प्रामुख्याने भारतीय जनता पार्टीचे शिरूर (का.) तालुका अध्यक्ष सुरेश (अप्पा) उगलमुगले,नगरसेवक गणेश तळेकर, मा.प्रताप कातकडे, मा. अरविंद फरताडे,मा.अजय कुचेरिया,मा.अजिनाथ धोत्रे, तसेच नगरपंचायतचे गटनेते गणेश भांडेकर, नगरसेवक वसंतराव काटे, मा. अर्जूनकाका गाडेकर, मा. सावता कातकडे, मा. अमोल चव्हाण, मा. सभापतीचे प्रतिनिधी प्रा.अक्षय रणखांब, युवा नेते सागर केदार,मा.अंकुश नागरगोजे,मा.प्रकाश ढगे,मा.नवनाथ मिसाळ,त्याच प्रमाणे रायमोहचे सरपंच मा.सुभाष (काका) क्षीरसागर, पाडळीचे माजी सरपंच रामदासजी हांगे,शिरूर पंचायत समिती सभापतीचे प्रतिनिधी मा. विजयदादा सरवदे,मा. प्रकाश इंगळे, मा.किरण चव्हाण, मा. अण्णासाहेब राऊत,मा.भारत बहिर, मा. प्रभाकर सानप, तसेच परिसरातील अनेक मान्यवरांनी प्राचार्य केशव भांगे साहेबांचा भव्य असा नागरी सत्कार केला आहे.या प्रसंगी विद्यालयातील, उपप्राचार्य देशमाने सर, पर्यवेक्षक जनार्दन काळे,परीक्षा प्रमुख प्रा.नामदेव तरकसे, व सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, मोठ्या संखेने उपस्थित होते.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**दौलताबाद (जावेद अहमद) :** देवगिरी विद्यालय दौलताबाद येथे शाळांत प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी मार्च 2025 मध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. या कार्यक्रमासाठी अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक ईश्वर पाटील हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून ग्रामशिक्षण समितीचे अध्यक्ष संजय श्रीखंडे पाटील सुलतानपूरकर, ग्रामशिक्षण समितीचे संचालक चंद्रकांत भराट, शरणापुर ग्रामपंचायतचे सरपंच संध्याताई सदावर्ते, पर्यवेक्षिका ज्योती सोनुले, भदाणे सर, मधुकर कान्हेरे हे होते. कार्यक्रमाच्या वेळी पालक साईनाथ सोनवणे, संतोष घुले, महालिंग सदावर्ते तसेच विद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अण्णा आहेर यांनी केले तर आभार प्रदर्शन पठाडे सर यांनी मानले.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903


## वृक्षारोपण करून सौरव मगरे आणि साहिल मगरे यांचा वाढदिवस संपन्न



**मिटमिटा (प्रा. शिवाजी गायकवाड) :** भागातील विविध ठिकाणी वृक्षारोपण करून इंजिनीयर सौरव मगरे आणि इंजिनियर साहिल मगरे यांचा वाढदिवस संपन्न झाला. याप्रसंगी सिद्धार्थ ग्रंथालय व माहितीशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. मनोहर वानखडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी वानखडे म्हणाले ,आज जगामध्ये पर्यावरणामध्ये मोठ्या प्रमाणावर बदल घडून येत आहेत. आज आपल्यासमोर मोठे संकट आहे .ते जागतिक तापमान आणि हवामानात बदल होत आहे. अलीकडे काही वर्षापासून पृथ्वीचे तापमान दरवर्षी सतत वाढत. त्यामुळे हवेचे प्रदूषण व औद्योगिकरण यामुळे प्रदूषणामध्ये वाढ होत आहे. तापमानामुळे हवामान बदलते व निसर्ग चक्रही बदलत असते. चक्रीवादळाचे प्रमाण सुद्धा वाढलेले दिसत आहे. या सर्व बाबींचा परिणाम हा मानवी जीवनावर होत आहे. आणि त्यामुळे नैसर्गिक हवेचे प्रदूषण कमी करण्याची क्षमता फक्त वृक्षामध्येच आहे आणि म्हणून आज सौरव मगरे आणि साहिल मगरे यांचा वाढदिवशी सिद्धार्थ ग्रंथालय व माहितीशास्त्र महाविद्यालयातर्फे मिटमिटा भागात वेगवेगळ्या ठिकाणी वृक्षारोपण करून हा वाढदिवस साजरा करण्यात आला .या कार्यक्रमाचे संचलन श्री .आसित शेगावकर यांनी केले तर दीपक पाईकराव यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०५ जुलै २०२५

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले - जय गुजरात



**धाराशिव :** अमित शहा यांच्या उपस्थितीत पुण्यातील एका कार्यक्रमात एकनाथ शिंदे यांनी थेट गुजरातची घोषणा दिली. त्यामुळे आता मोठे राजकीय वादंग निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विरोधकांच्या प्रतिक्रिया देखील येत असून जोरदार टीका केली जात आहे. आता मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे यांनी देखील खऊट प्रतिक्रिया दिली आहे.

मनोज जरांगे पाटील आज विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूर दौऱ्यावर जात असताना त्यांनी धाराशिव जिल्ह्यातील येरमाळा येथे माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले, एकनाथ शिंदे यांनी जय गुजरात म्हणणे हे चांगले नाही. माझी प्रतिक्रिया खूप खऊट असते. पण मी ते ऐकले नाही, त्यामुळे त्याच्यावर आत्ताच बोलणार नाही, असे जरांगे म्हणाले. तसेच तुम्हाला हिंदी सक्ती करायची तर देशात मराठी सक्ती करा, ते होणार आहे का? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला.

दरम्यान, शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी थेट शहा सेना असा उल्लेख करत एकनाथ शिंदेंवर टीका केली आहे. संजय राऊत म्हणाले, अमित शहा यांच्या डुप्लिकेट शिवसेनेचे खरे रूप आज बाहेर आले. पुण्यात या महाशयांनी अमित शहा समोर 'जय गुजरात'ची गर्जना केली! काय करायचे? ऐशा नरा मोजूनी माराव्या पैजारा हजार माराव्या आणि एक मोजाव्या. हा माणूस महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात कसा राहू शकतो? असा सवाल देखील संजय राऊत यांनी विचारला आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे सध्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. त्यांच्या उपस्थितीत पुण्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अशाच एका कार्यक्रमात एकनाथ शिंदे यांनी देखील सहभाग घेतला. या दरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'जय गुजरात' अशी घोषणा करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. भाषणादरम्यान एकनाथ शिंदे यांनी जय हिंद, जय महाराष्ट्र आणि जय गुजरात असा नारा दिला. त्यामुळे आता अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

# कुणाल कामरा आणि सुषमा अंधारेंच्या अडचणीत वाढ





**मुंबई :** मागील विधीमंडळाच्या अधिवेशनादारम्यान कॉमेडियन कुणाल कामरा आणि शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांच्यावर हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल करण्यात आला होता. आता पावसाळी अधिवेशनात प्रस्ताव मंजूर झाला आहे. त्यामुळे या दोघांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

कुणाल कामराने त्याच्या एका शोमध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर व्यंगात्मक गाणे गायले होते. एकनाथ शिंदे यांनी केलेले बंड तसेच त्यांची दाढी चष्मा यावरून कुणाल कामराने विडंबनात्मक गाणे गायले होते. त्याचा हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक होत जिथे कार्यक्रम झाला होता तिथली तोडफोड केली होती. मुंबईतील काही पोलिस ठाण्यात त्याच्या विरोधात गुन्हा देखील दाखल करण्यात आला होता.

तसेच सुषमा अंधारे यांनी देखील कुणाल कामराचे गाणे गात एक व्हिडिओ बनवला होता. त्यामुळे या दोघांच्या विरोधात हक्कभंग दाखल करण्यात आला होता. त्या प्रस्तावाला आता मंजूरी मिळाली आहे. कुणाल कामरा आणि सुषमा अंधारे यांच्या विरोधात सोमवारी नोटीस काढली जाणार असून या दोघांच्या अडचणीत वाढ होणार आहे.

भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी हा हक्कभंग दाखल केला आहे. सुषमा अंधारे यांनी बोलताना वापरलेली खालच्या पातळीवरील भाषा आणि कुणाल कामराने हेतुपूरस्सर उपमुख्यमंत्री यांच्यावर वैयक्तिक आणि उपरोधक केलेले गाणे यातील भाषा एकप्रकारे सभागृहाचा अवमान करणारी आहे. त्यामुळे कुणाल कामरा आणि सुषमा अंधारे यांच्याविरोधात हक्कभंग मांडण्यास अनुमती द्यावी, अशी विनंती प्रवीण दरेकर यांनी केली होती. यावर सभापती राम शिंदे यांनी हे प्रकरण विशेषाधिकार समितीकडे योग्य त्या कारवाईसाठी पाठवत असल्याचे जाहीर केले आहे.

# महाराष्ट्रात राहायचे असेल तर मराठी शिकली पाहिजे-अजित पवार

**मुंबई :** पुण्यात एका कार्यक्रमात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासमोर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जय गुजरातचा नारा दिला. यानंतर त्यांच्यावर विरोधकांनी जोरदार टीका करण्यास सुरुवात केली आहे. महाराष्ट्रात आधीच भाषेचा वाद सुरू असताना अशा प्रकारच्या नाऱ्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. तर दुसरीकडे मुंबईतील एका उद्योजकाने मी मराठी बोलणार नाही, असे म्हणत राज ठाकरेंना आव्हान केले आहे. यावर उपमुख्यमंत्री अजित पवारांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे.

पत्रकारांशी बोलताना अजित पवार म्हणाले, पुण्यात अमित शहा यांचे दोन-तीन कार्यक्रम झाले. पहिल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलले नंतर मी एका कार्यक्रमात होतो. मी असे पर्यंत तर मी असे काही ऐकले नाही. कारण मी माझा कार्यक्रम झाला की निघून आलो होतो. त्यामुळे एकनाथ शिंदे काय म्हणाले हे मला माहीत नाही, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.

मुंबईतील एका उद्योजकाने मी मराठी बोलणार नाही असे म्हणत थेट राज ठाकरेंना आव्हान दिले आहे. यावर प्रश्न विचारला असता अजित पवार म्हणाले, आपला देश हा अनेक जाती धर्मात विखुरला गेलेला देश आहे. अनेक भाषा बोलल्या जातात. 14 महत्त्वाच्या भाषांचा उल्लेख केला जातो. आपल्या महाराष्ट्रातील मातृभाषा ही मराठी आहे. इतके वर्ष आपण प्रयत्न करत होतो की मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या वर्षी तो दर्जा दिला. आपल्या महाराष्ट्रात जो कोणी शिक्षण घेतो त्याला मराठी लिहिता आली पाहिजे, बोलता आली पाहिजे.

पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, मराठी भाषा ही सक्तीची सुद्धा केली आहे. आपण इंग्रजीत शिका किंवा इतर कोणत्याही माध्यमात शिका त्यात मराठी असणारच. कोल्हापूर भागातील सीमावर्ती गावात्या लोकांना महाराष्ट्रात यायचे आहे. तिथल्या कर्नाटक सरकारने तिथे कानडी भाषा सक्तीची केली आहे. मराठी जवळपास बंदच केली आहे. परंतु, तिथल्या भागातील अनेक शाळांमध्ये आपण आपल्या शाळांमध्ये मराठीची सक्ती केली आहे.

मुंबई हे कॉस्मो पॉलिटन शहर आहे. इथे अनेक भागांतून लोक राहायला येतात. महाराष्ट्रात राहायचे असेल तर तुमच्या मुलांना शाळेत मराठी शिकवले पाहिजे, असेच आमचे धोरण आहे. पण त्यांनी अशा पद्धतीचे वक्तव्य का केले असेल, यामागची पार्श्वभूमी काय आहे हे बघावे लागेल. कारण मी आत्ता पुण्यातून आलो. आता त्याला मराठी येतच नसेल तर तो म्हणणारच की बाबा मला येत नाही मराठी. कोणतीही भाषा बोलण्याचा संविधानाने दिलेला अधिकार आहे. पण मराठी बहुतेकांना समजते. तुम्ही ज्या राज्यात राहतात तिथली नवीन पिढी भाषा शिकण्याचा प्रयत्न करत असते. जुने लोक तेवढा प्रयत्न करत नाहीत, असे अजित पवार म्हणाले.

प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०५ जुलै २०२५


## ठाकरे बंधू एकत्र आल्यानंतर मृत्यूचीही खंत नाही : प्रकाश महाजन



**मुंबई :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे एकत्र आल्यानंतर आपल्याला मृत्यू आला तरी त्याची कोणतीही खंत नसेल, असे भावूक उद्गार मनसे नेते प्रकाश महाजन यांनी काढले आहेत. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या समाधीचे दर्शन घेतल्यानंतर ते पत्रकारांशी संवाद साधत होते.

महाराष्ट्रात हिंदीच्या सक्तीवरून राजकारण पेटले आहे. सरकारने हिंदी सक्तीचा जीआर रद्द केल्यानंतरही हा वाद शमला नाही. उलट मनसे व ठाकरे गटाने शनिवारी मुंबईत विजयी मेळावा घेण्याची घोषणा करून या वादाला हवा देण्याचे काम केले. विजयी मेळाव्याच्या निमित्ताने राज व उद्धव ठाकरे प्रथमच एका व्यासपीठावर येणार आहेत. या पार्श्वभूमीवर मनसे नेते प्रकाश महाजन यांनी उपरोक्त भावना व्यक्त केली आहे.

प्रकाश महाजन म्हणाले की, राज ठाकरे व उद्धव ठाकरे एकत्र येण्याचा क्षण पाहण्यासाठी बाळासाहेब ठाकरे हवे होते. हीच गोष्ट सांगण्यासाठी मी आज त्यांच्या समाधीपाशी आलो होतो. मी त्यांना प्रत्यक्षात ही गोष्ट सांगू शकत नाही. पण उद्याच्या सोहळ्यानंतर मला मृत्यू आला तर मी वर जाऊन बाळासाहेबांना सांगेन की, मी राज - उद्धव एकत्र येण्याचा सोहळा पाहिला आहे. दोन भाऊ मराठी माणूस, मराठी भाषा, शेतकरी व महाराष्ट्रासाठी एकत्र आलेत. मी हा आनंद सोहळा आपल्या डोळ्यांनी पाहिला आहे. बाळासाहेब तुम्ही आता महाराष्ट्राची चिंता करू नका.

ते पुढे म्हणाले, काही दिवसांपूर्वी मी पक्षशिस्त झुगारून दोन्ही भावांनी एकत्र येण्याची भूमिका मांडली होती. मी दोन्ही नेत्यांसोबत दौरे केलेत. माझे नेते राज ठाकरे हे जळजळते निखारे आहेत. तर उद्धव ठाकरे शीतल आहेत. मी शरद पवारांचे आभार मानतो. ते म्हणाले होते की, राज ठाकरे यांच्या सभेला गर्दी होते आणि उद्धव यांच्या सभेच्या गर्दीचे मतांमध्ये रुपांतर होते. आता ही गर्दी व मतांचे रुपांतर एकत्र होणार आहे. हा आमच्यासाठी आनंदाचा क्षण आहे.

प्रकाश महाजन यांनी यावेळी ठाकरे बंधूंच्या मनोमिलनावर टीका करणाऱ्या महायुतीच्या नेत्यांवरही निशाणा साधला. ते म्हणाले, मी माझे दोन्ही भाऊ गमावले. भाऊ हा आधार असतो. त्यामुळे हे दोन्ही भाऊ उद्या एकत्र आल्यास त्यांना एकमेकांचा आधार मिळेल. मराठी माणसांसाठी हे दोघे भाऊ कायम एकत्र राहतील हा माझा शब्द आहे. महाराष्ट्रात तरुण नेता आला, तर तो सर्वांना सोबत घेतो. आज बाळासाहेबांसह आमच्या सर्वांची इच्छा पूर्ण होणार आहे.

पण या दोन सिंहांनी एकत्र येऊ नये म्हणून काही कोल्हे कोल्हेकुई करत आहेत. त्यांना आपल्या मालकाला खूश करायचे आहे. पण आता साक्षात ब्रह्मदेव खाली आला तरी मराठी माणसांसाठी झालेली ही युती तोडू शकत नाही. हे दोन भाऊ मराठी माणसांसाठी हक्काचे ठिकाण झाले

## जास्त बाम लावल्याने रामदास कदम यांच्या डोक्यावर परिणाम : आदित्य ठाकरे





**मुंबई :** डोक्याला जास्त बाम लावल्यामुळे रामदास कदम यांच्या डोक्यावर परिणाम झाला, अशी तिखट टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी शुक्रवारी सत्ताधारी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांच्यावर टीका केली. त्यांच्या या टीकेमुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेतून तीव्र प्रतिक्रिया येण्याची शक्यता आहे.

रामदास कदम यांनी नुकतीच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली होती. उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांचा वेळोवेळी अवमान केल्याचा आरोप त्यांनी केला होता. पत्रकारांनी शुक्रवारी या प्रकरणी आदित्य ठाकरे यांना छेडले असता त्यांनी उपरोक्त शब्दांत टीका केली. जास्त बाम लावल्यामुळे डोक्यावर परिणाम होतो हे त्याचे उदाहरण आहे. त्या व्यक्तीचा निवडणुकीत दोनवेळा पराभव झाला. त्यानंतरही त्यांना विधान परिषदेवर संधी दिली गेली. मंत्रिपद देण्यात आले. पण त्यानंतरही ते पळून गेले. मी त्या व्यक्तीवर बोलू इच्छित नाही, असे ते म्हणाले.

आदित्य ठाकरे यांनी यावेळी पाकिस्तानी हॉकी संघाला भारतात खेळण्याची संधी देण्यावरून केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारवरही निशाणा साधला. पहलगाम हल्ल्यातील दहशतवादी अद्याप पकडले गेले नाहीत. त्या हल्ल्याच्या जखमा अद्याप बऱ्या झालेल्या नाहीत. पण त्यानंतरही केंद्राने यंदा भारतात होणाऱ्या हॉकी आशिया कपमध्ये पाकिस्तानला खेळण्यास परवानगी दिली आहे. त्यानंतर बीसीसीआय आपला भारतीय संघ पाकिस्तानविरुद्ध क्रिकेट आशिया कपमध्ये खेळवेल.

किती लाजिरवाणी गोष्ट आहे! पाकिस्तानकडून दहशतवादाविरुद्ध निर्णायक कारवाई होईपर्यंत आपण जाहिरातींमधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा मोह रोखू शकतो का? दहशतवाद पूर्णपणे नष्ट होईपर्यंत अशा घटनांमधून पाकिस्तानला फायदा होऊ देणार नाही याबद्दल केंद्र सरकार ठाम राहू शकत नाही का? असा सवाल त्यांनी या प्रकरणी मोदी सरकारला केला आहे.

सरकार पाकसोबत हॉकी व क्रिकेट खेळणार आहे का? हे स्पष्ट करावे. देशाचे परराष्ट्र मंत्री काय करत आहेत? बीसीसीआयने म्हटले आहे की, आम्ही खेळणार नाही तर आयसीसीला ऐकावे लागेल. पण आयसीसीच्या अध्यक्षपदी कोण आहे? जय शहा. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे चिरंजीवच आयसीसीचे अध्यक्ष आहेत, मग आशिया कप स्पर्धेत पाकिस्तानला एंट्री का? असा सवालही आदित्य यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे.

## मराठी शिकणार नाही, काय करायचे ते करा : व्यावसायिक सुशील केडिया

**मुंबई :** गत काही दिवसांपासून मराठी भाषेच्या मुद्यावरून राज्याचे राजकारण तापले आहे. सरकारने प्राथमिक शिक्षणात हिंदी भाषेची सक्ती करणारा जीआर मागे घेतला. पण त्यानंतर मनसे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने या विरोधात 5 जुलै रोजी विजयी मेळावा आयोजित करण्याची घोषणा केली. यामुळे मुंबईतील वातावरण तापले असताना आता उद्योगपती सुशील केडिया यांनी राज ठाकरेंसारख्या लोकांना नाटक करण्याची परवानगी मिळेत असेपर्यंत आपण मराठी शिकणार नसल्याचे वादग्रस्त विधान केले आहे. दरम्यान, शिवसेनेच्या ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी केडिया यांना या प्रकरणी योग्य ते उत्तर देण्याचा इशारा दिला आहे.

महायुती सरकारने पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला होता. पण या प्रकरणी वाद झाल्यानंतर त्यांनी हा निर्णय मागे घेतला. पण आता या वादाने मराठी विरुद्ध अमराठी असे रूप घेतले आहे. त्यातच मुंबईत मनसेच्या कार्यकर्त्यांनी एका अमराठी दुकानदाराला केलेली मारहाण व त्यानंतर व्यापाऱ्यांनी काढलेल्या मोर्चामुळे स्थिती अधिकच चिघळली आहे. या पार्श्वभूमीवर केडियोनोमिक्सचे संस्थापक सुशील केडिया यांनी राज ठाकरे यांना उपरोक्त आव्हान दिले आहे.

मागील 30 वर्षे मी मुंबईत राहिलो. त्यानंतरही मला मराठी भाषा फारशी कळत नाही. तसेच तुम्ही ज्या प्रकारे गैरवर्तन करत आहात, ते पाहता तुमच्यासारख्या लोकांना मराठी माणसांची काळजी घेण्याचे नाटक करण्याची परवानगी दिली जात राहील तोपर्यंत मी मराठी शिकणार नाही अशी प्रतिज्ञा करतो. काय करावे लागेल बोल? असे सुशील केडिया यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. केडिया यांनी आपले हे ट्विट थेट राज ठाकरे यांनाही टॅग केले आहे. त्यामुळे या प्रकरणी मोठा वाद होण्याची शक्यता आहे.

सुशील केडिया आपल्या अन्य एका पोस्टमध्ये म्हणाले, ड्रामा बंद कर राज ठाकरे. तुझ्या 2-4 गुंडांनी माझ्या 10-20 थोपाडीत मारल्या तर मारू देत. पण आम्ही आमच्या पद्धतीने आमरण उपोषणाला बसलो तर तू हात जोडून माफी मागत नाही तोपर्यंत उपोषणावरून उठणार नाही. मग काय उरेल तुझ्याकडे?

राज ठाकरे अमराठी व्यक्तींना धमक्या देत असताना देवेंद्र फडणवीस शांत राहणार का? असा प्रश्नही केडिया यांनी मुख्यत्र्यांना उद्देशून केलेल्या एका पोस्टमध्ये केला आहे.

सुशील केडिया हे एक प्रसिद्ध व्यावसायिक व केडियानोमिक्सचे संस्थापक आहेत. ते शेअर बाजारातील तज्ज्ञ म्हणूनही ओळखले जातात. त्यांची गुंतवणूक सल्लागार म्हणूनही ओळख आहे. त्यांची कंपनी गुंतवणूक व बाजारपेठेतील विश्लेषणाचे काम करते. मागील 25 वर्षांपासून ते राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय बँकांसोबत काम करत आहेत. मार्केट टेक्निशियन्स असोसिएशनाच्या संचालक मंडळावर वर्णी लागलेले ते आशियातील पहिले व्यक्ती आहेत. सुशील केडिया अनेक बिझनेस चॅनेलवर पाहुणे म्हणून जातात. तिथे ते शेअर बाजार आणि गुंतवणूक विषयावर अधिकारवाणीने बोलतात. मुंबईत राहणाऱ्या केडियांना हिंदी, इंग्रजीशिवाय बंगाली, गुजराती, मराठी भाषा अवगत आहे.


